**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**महापालिका सचिव कार्यालय**
**दि. १३/१०/२०२६**

## मा. महासभा दि. १६/१०/२०२६
## पुरक घोषणा

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीम. -------------------------------------------**

**नगरसेवक/नगरसेविका**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १६/१०/२०२६ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| १११ | सन्मा. सदस्या शर्मिला बगाजी यांचा दिनांक १२/१०/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----------------------------------------------------------------------<br>महानगरपालिका प्रवेशद्वारावर टपाल नोंदणी कक्षाच्या व्यवस्थाबाबत. |

(दिनेश कैलास कानगुडे)
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with CamScanner

सौ. शर्मिला वि. बगाजी (गंडोली)
नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी – महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे – ४०१ १०१.

निवास : उत्तन भाटेबंदर, वेलंकनी रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे – ४०१ १०६ मोबाईल : 8369048398
कार्यालय : अहमद नियाज मंजील, उत्तन पाली रिक्षा स्टँडजवळ, मेट्रो सिटी बँकेच्या जवळ, भाईंदर (प.) – ४०१ १०६.

जावक क्र. प्रकरण क्र. १११ दिनांक 12/10/2026

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग प्र.घो.
स.प./क.प./प.प./का.स./पा.अ.
आवक क्र १0....दि १२/१0/२०२६

प्रति,
माननीय सचिव,
मीरा भाईंदर महानगरपालिका

**विषय - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 2 नियम 1(ज) अन्वये मा. महासभा दिनांक 16/10/2026 मध्ये महानगरपालिका प्रवेशद्वारावर टपाल नोंदणीकक्षाच्या व्यवस्थाबाबत ज अंतर्गत प्रस्ताव घेणे बाबत**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय प्रवेशद्वारासमोर महानगरपालिका टपाल नोंदणी कक्ष आहे, सदर कक्ष महापालिका व्याप्तीच्या मनाने अत्यंत छोटा आहे आणि टपाल देण्यासाठी नागरिकांना फुटपाथ वर गटारावर उभे राहून टपाल द्यावे लागते सदर ठिकाणी नागरिकांना उभे राहण्याची ही व्यवस्था नाही, सीनियर सिटीजन यांना टपाल देण्याकरिता वेगळे कक्ष नाही त्या ठिकाणी अनेक वेळा प्रवासी वाहन उभी करून जातात त्यामुळे टपाल कक्षापर्यंत पोचणे कठीण असते. त्यावरही प्रशासन दुर्लक्ष करते. महापालिकेचे नागरिक सन्माननीय आहेत.

महापालिकेचे अधिकारी हे मोठमोठ्या केबिनमध्ये व वातानुकूलित व्यवस्थेमध्ये बसतात ही बाब निषेधार्थ आहे, तरी हे आपणास विनंती आहे हे टपाल कक्ष महापालिकेच्या परिसरात आतल्या बाजूला वातानुकलीत, सीनियर सिटीजन व नागरिकांना सन्मानपूर्वक टपाल देता येईल अशी व्यवस्था करण्याबाबत दि. 16/10/2026 रोजीच्या मा. महासभेत महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे **ज** चा प्रस्ताव सादर करीत आहे.

आपली विश्वासू,

शर्मिला विन्सन बगाजी
नगरसेविका - प्रभाग 24
मीरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner